## आयुर्वेद शिक्षण मंडळाचे संस्थापक आणि स्वातंत्र्य सैनिक

## कै. वैद्यराज हरीभाऊ परांजपे

## यांच्या ३७ व्या स्मृति दिनानिमित्त बुधवार दिनांक १८ ते शुक्रवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२०

## ३७ वे आरोग्य प्रदर्शन २०२० आणि मोफत रोगनिदान चिकित्सा उपक्रम

## अहवाल

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आयुर्वेद शिक्षण मंडळाचे संस्थापक आणि स्वातंत्र्य सैनिक कै. वैद्यराज हरीभाऊ परांजपे यांच्या ३७ व्या स्मृति दिनानिमित्त बुधवार दिनांक १८ ते शुक्रवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२० या कालावधीमध्ये ३७ वे आरोग्य प्रदर्शन २०२० आणि मोफत रोगनिदान चिकित्सा उपक्रम आयोजित केले. या उपक्रम व प्रदर्शनाचे उद्घाटन आयुर्वेद शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.श्री.सुनिल बहिरट यांच्या हस्ते झाले. आयुर्वेद शिक्षण मंडळाची स्थापना ज्या प्रेरणेने वैद्यराज हरिभाऊ परांजपे यांनी केली आणि ज्या विषम परिस्थितीतून हया संस्थेचे रोपटे वाढवून त्यांनी देशभर नावारुपास आणले हे खरोखर गौरवास्पद आहे. संस्थेच्या वाढीच्या दूरदृष्टीने, निस्पृहतेने त्यांनी पै पै जमवून आज त्याचा वटवृक्ष होण्यासाठी त्यास स्वत:चे तन मन धन अर्पिले. त्यांच्या कष्टाची फळं आजच्या पिढीला ज्ञान संवर्धन करणा-या हया संस्थतून चाखायला मिळत आहेत. आपल्यावर हया संस्थेचे कार्य असेच पुढे घेऊन जाण्याची सामूहिक जबाबदारी आहे त्यातून भविष्यातील हया देशातील पिढीला आयुर्वेदाची ज्ञानधारा अव्याहतपणे उपलब्ध करुन देऊ शकू असे मनोगत श्री.बहिरट यांनी व्यक्त केले.

सदर उपक्रमात विविध विभागांमध्ये २६२ रुग्णांनी लाभ घेतला त्यापैकी ६७ रुग्णांनी नेत्र तपासणी केली व ४५ रुग्णांना मोफत चष्मे वाटप केले तसेच जेष्ठ व गरजू अशा एकुण १६७ रुग्णांना मोफत औषधे देण्यात आले.

तसेच आरोग्य उपयोगी आयुर्वेदाच्या विविध वनौषधींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनास २६२ लोकांनी भेट दिली व अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्या तज्ञांनी त्यांना मार्गदर्शन केले. सदर उपक्रम व प्रदर्शनास समाजातील विविध मान्यवर व व्यक्तिंनी भेट दिली. त्यानुसार आयुर्वेदिक उपचाराविषयी विविध मान्यवर व रुग्णांनी आपल्या तज्ञ डॉक्टरांकडून माहिती घेतली.

सदर उपक्रम व प्रदर्शन या कार्यक्रमात महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे सर्व तज्ञ डॉक्टर्स, अध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी इत्यादींनी उत्साहपुर्ण सहभाग घेतला. या उपक्रमासाठी शिबिर प्रमुख मा.डॉ.म.ह.परांजपे, (सचिव,आयुर्वेद शिक्षण मंडळ,पुणे) व मा.प्रा.डॉ.सतीश डुंबरे (प्राचार्य तथा अधिक्षक, अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, पुणे), मा.डॉ.सौ.मीरा परांजपे (संस्थापक सदस्य आयुर्वेद शिक्षण मंडळ), डॉ.सौ.हेमलता जालगांवकर (उपप्राचार्य-अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे), डॉ.विष्णुदत्त अगरवाल (सीसीआयएम सदस्य नवी दिल्ली) यांनी आपल्या आजच्या युगामध्ये आयुर्वेद हा किती महत्वाचा घटक आहे हे विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक, स्वागत आणि आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ.सतीश डुंबरे यांनी केले.

प्रा.डॉ.सतीश डुंबरे,
अधिक्षक,
अष्टांग आयुर्वेद रुग्णालय, पुणे

## आयुर्वेद शिक्षण मंडळाचे संस्थापक आणि स्वातंत्र्य सैनिक

## कै. वैद्यराज हरीभाऊ परांजपे

## यांच्या ३७ व्या स्मृति दिनानिमित्त बुधवार दिनांक १८ ते शुक्रवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२०

## ३७ वे आरोग्य प्रदर्शन २०२० आणि मोफत रोगनिदान चिकित्सा उपक्रम

## अहवाल

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आयुर्वेद शिक्षण मंडळाचे संस्थापक आणि स्वातंत्र्य सैनिक कै. वैद्यराज हरीभाऊ परांजपे यांच्या ३७ व्या स्मृति दिनानिमित्त बुधवार दिनांक १८ ते शुक्रवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२० या कालावधीमध्ये ३७ वे आरोग्य प्रदर्शन २०२० आणि मोफत रोगनिदान चिकित्सा उपक्रम आयोजित केले. या उपक्रम व प्रदर्शनाचे उद्‌घाटन आयुर्वेद शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.श्री.सुनिल बहिरट यांच्या हस्ते झाले. आयुर्वेद शिक्षण मंडळाची स्थापना ज्या प्रेरणेने वैद्यराज हरिभाऊ परांजपे यांनी केली आणि ज्या विषम परिस्थितीतून हया संस्थेचे रोपटे वाढवून त्यांनी देशभर नावारुपास आणले हे खरोखर गौरवास्पद आहे. संस्थेच्या वाढीच्या दूरदृष्टीने, निस्पृहतेने त्यांनी पै पै जमवून आज त्याचा वटवृक्ष होण्यासाठी त्यास स्वत:चे तन मन धन अर्पिले. त्यांच्या कष्टाची फळं आजच्या पिढीला ज्ञान संवर्धन करणा-या हया संस्थतून चाखायला मिळत आहेत. आपल्यावर हया संस्थेचे कार्य असेच पुढे घेऊन जाण्याची सामूहिक जबाबदारी आहे त्यातून भविष्यातील हया देशातील पिढीला आयुर्वेदाची ज्ञानधारा अव्याहतपणे उपलब्ध करुन देऊ शकू असे मनोगत श्री.बहिरट यांनी व्यक्त केले.

सदर उपक्रमात विविध विभागांमध्ये २६२ रुग्णांनी लाभ घेतला त्यापैकी ६७ रुग्णांनी नेत्र तपासणी केली व ४५ रुग्णांना मोफत चष्मे वाटप केले तसेच जेष्ठ व गरजू अशा एकुण १६७ रुग्णांना मोफत औषधे देण्यात आले.

तसेच आरोग्य उपयोगी आयुर्वेदाच्या विविध वनौषधींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनास २६२ लोकांनी भेट दिली व अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्या तज्ञांनी त्यांना मार्गदर्शन केले. सदर उपक्रम व प्रदर्शनास समाजातील विविध मान्यवर व व्यक्तिंनी भेट दिली. त्यानुसार आयुर्वेदिक उपचाराविषयी विविध मान्यवर व रुग्णांनी आपल्या तज्ञ डॉक्टरांकडून माहिती घेतली.

सदर उपक्रम व प्रदर्शन या कार्यक्रमात महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे सर्व तज्ञ डॉक्टर्स, अध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी इत्यादींनी उत्साहपुर्ण सहभाग घेतला. या उपक्रमासाठी शिबिर प्रमुख मा.डॉ.म.ह.परांजपे, (सचिव,आयुर्वेद शिक्षण मंडळ,पुणे) व मा.प्रा.डॉ.सतीश डुंबरे (प्राचार्य तथा अधिक्षक, अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, पुणे), मा.डॉ.सौ.मीरा परांजपे (संस्थापक सदस्य आयुर्वेद शिक्षण मंडळ), डॉ.सौ.हेमलता जालगांवकर (उपप्राचार्य-अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे), डॉ.विष्णुदत्त अगरवाल (सीसीआयएम सदस्य नवी दिल्ली) यांनी आपल्या आजच्या युगामध्ये आयुर्वेद हा किती महत्वाचा घटक आहे हे विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक, स्वागत आणि आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ.सतीश डुंबरे यांनी केले.

प्रा.डॉ.सतीश डुंबरे,<br>
अधिक्षक,<br>
अष्टांग आयुर्वेद रुग्णालय, पुणे